For shares held in Physical form	Members holding shares in physical form, who have not registered/ updated their e-mail addresses, PAN, KYC, Bank and Choice of Nomination with the Company are requested to register / update the same by submitting following documents/details to RTA of the Company i.e. MAS Services Limited at T-34 2nd Floor, Okhla Industrial Area, Phase-II, New Delhi 110020, email: investor@masserv.com : 1. E-mail, Mobile No. and PAN, using form ISR-1; 2. Choice of Nomination in Form No. SH-13 or a declaration to 'Opt-out' in Form ISR-3; 3. Contact details including Postal address with PIN code (in case of change of address); 4. Bank Account details including Bank name and branch, Bank account number, MICR Code and IFS code (using form ISR-1); 5. Specimen signature (using form ISR-2); and 6. Any cancellation or change in nomination shall be provided in Form No. SH-14. Shareholders can download the above mentioned forms from the 'Download' section available on the Company's website under Investor head and is also available on the website of the RTA at https://www.masserv.com/downloads.asp. Please update the same on or before 18th August, 2026.
For shares held in Demat Form	Shareholders holding shares in dematerialized mode are requested to register / update their PAN, Nomination Details, Contact details (Address with PIN, Mobile number and Email address), Bank account details and Specimen signature with the relevant Depository Participant. Please update the same on or before 18th August, 2026.

Book Closure and Record Date: NOTICE is also hereby given that pursuant to Section 91 of the Act read with Rule 10 of the Companies (Management & Administration) Rules, 2014 and Regulation 42 of SEBI Listing Regulations, 2015, the Company has fixed Tuesday, 18th August, 2026 as Record date for the purpose of determining entitlement of members for final dividend of ₹ 3/- per equity share of ₹ 2/- (Two Rupees Only) each fully paid-up of the Company (including special dividend of ₹ 1/- per equity share) (i.e. 150% including 50% as special dividend), for the Financial Year 2025-26, if declared. Also, the Register of Members and Share Transfer Books of the Company shall remain close from Wednesday, 19th August, 2026 to Tuesday, 25th August, 2026 (both days inclusive) for taking record of the Members of the Company for the purpose of 77th Annual General Meeting.

E-voting: Notice is hereby given that in compliance with the provisions of Section 108 of the Act and rules made thereunder read with Regulation 44 of SEBI Listing Regulations, 2015, the Company has offered e-voting facility to its members, holding shares either in physical form or in dematerialized form, as on the Record date i.e. Tuesday, 18th August, 2026, for transacting all the businesses / resolutions set forth in the Notice of AGM electronically:

(A) **Remote e-voting:** The remote e-voting period commences on Thursday, 20th August, 2026 at 09:00 A.M. and ends on Monday, 24th August, 2026 at 05:00 P.M. No e-voting shall be allowed beyond the said date and time. The remote e-voting module shall be disabled by NSDL for voting thereafter.

(B) **E-voting at AGM:** The facility for voting through e-voting shall also be made available at the AGM to those members who have not cast their votes by remote e-voting and are attending the AGM through VC/OAVM. The members who have cast their vote by remote e-voting prior to the AGM may also attend the AGM but shall not be entitled to cast their vote again.

Once the vote on a resolution is cast by the member, the member shall not be allowed to change it subsequently.

M/s. Vijay K. Singhal & Associates, Company Secretaries, (Shri Vijay K. Singhal, Proprietor), has been appointed as Scrutinizer for the e-voting process. The detailed procedure for remote e-voting is contained in the email sent with the Notice of the AGM and also available on the website of the Company i.e. www.jmaindia.com. Any person, who becomes a member of the Company after dispatch of the Notice of the Meeting and holding shares as on the Record date i.e. Tuesday, 18th August, 2026 may generate the Login ID and password by following the procedure as provided in the Notice of the AGM. Members, who need assistance before or during the AGM, can contact NSDL on evoting@nsdl.com / 022-4886 7000 and our Registrar and Share Transfer Agent on investor@masserv.com / 011-26387281-82-83.

For and on behalf of
Jullundur Motor Agency (Delhi) Limited
Sd/-
Ramkesh Pal
Company Secretary
(M. No.: F13849)

Place: Gurugram
Date: 31st July, 2026

संपादकीय

पेपरफुटीला आळा बसेल?

सार्वजनिक परीक्षा (गैरप्रकारांना प्रतिबंध) सुधारणा विधेयक-२०२६ बुधवारी लोकसभेत आवाजी मतदानाने मंजूर करण्यात आले. आता हे विधेयक राज्यसभेत मंजूर करून घेण्यासाठी मांडले गेले आहे. खरे तर हे विधेयक २०२४ मध्येच मंजूर करून घेण्यात आले होते. परंतु त्यात पेपर फोडणाऱ्यांविरोधात अधिक कठोर तरतुदी करून ते नव्याने मांडले गेले. या विधेयकावर लोकसभेत अभ्यासपूर्ण चर्चा होईल, अशी अपेक्षा होती, परंतु या चर्चेत प्रामुख्याने विद्यार्थ्यांच्या आंदोलनात पोलिसांनी लाठीचार्ज, अश्रुधूर आणि पॅलेट गनचा केलेला वापर व बिहारमध्ये विद्यार्थ्यांवर एके-४७ रायफलमधून एका हवालदाराने गोळीबार केल्याच्या मुद्द्यावरून विरोधकांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांना लक्ष केले. त्यावरून गदारोळ झाला. वास्तविक एके-४७ रायफलमधून गोळीबार करणाऱ्या पोलीस हवालदाराला निलंबित करण्यात आले आहे. मात्र त्याला फक्त निलंबित करून चालणार नाही तर त्याच्यावर कठोर कारवाई होणे गरजेचे आहे. विरोधक याच मुद्द्यावरून सरकारची कोंडी करू पाहत होते. खासदार आणि विरोधी पक्षनेते राहुल गांधी, खासदार प्रियंका गांधी यांच्यासह विरोधी पक्षाच्या नेत्यांनी सार्वजनिक परीक्षा सुधारणा विधेयकाविषयी मुद्दे उपस्थित केले नाहीत. त्याचप्रमाणे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शिक्षण क्षेत्रात अमुलाग्र बदल करण्यासाठी इन्फोसिसचे सहसंस्थापक नंदन निलेकणी यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन केलेल्या कृती गटाबाबत आपली मते मांडणे आवश्यक होते. याचा अर्थ विद्यार्थ्यांवर पोलिसांनी केलेला अत्याचाराचा प्रश्न महत्त्वाचा नव्हता असे नाही. तो मुद्दा संसदेत उपस्थित करून त्याबाबत सरकारला जाब विचारत असतानाच विधेयक आणि कृतीगट किंवा जलद गती न्यायालयात पेपर फुटी प्रकरणाचा खटला चालविण्याबाबतच्या पंतप्रधानांच्या घोषणेचा समाचारही विरोधकांना घेता आला असता. या संदर्भात काही मुद्दे उपस्थित करण्याआधी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी प्रवेश परीक्षा पद्धतीत अमलाग्र सुधारणा सुचविण्यासाठी इन्फोसिसचे सहसंस्थापक नंदन निलेकणी यांच्या अध्यक्षतेखाली कृती गट स्थापन करण्याच्या केलेल्या घोषणेचे स्वागतच केले पाहिजे. शिवाय पेपर फुटीला आळा बसावा म्हणून त्यासंबंधीच्या विधेयकात सुधारणा करून पेपर फोडणाऱ्यांना कठोर शिक्षेची तरतूद असलेले विधेयक आता लोकसभेत मंजूर झाले आहे. राज्यसभेतही ते मंजूर होईल, अशी अपेक्षा आहे. कोणतेही गैरप्रकार घडू नयेत यासाठी कठोर कायदे तयार केले जातात, पण त्यामुळे गैरप्रकार थांबले असे दिसत नाही. म्हणूनच पेपर फोडणाऱ्यांविरुद्ध कायद्यात कठोर तरतुदी करण्याबरोबरच पेपरफुटी होऊच नये, अशी व्यवस्था तयार करण्यावर खरेतर भर देण्याची आवश्यकता आहे. २०२४ मध्ये हा कायदा मंजूर करून घेण्यात आला, पण त्याप्रमाणे पेपरफुटीच्या किती घटनांमध्ये दोषींना शिक्षा झाली? हा प्रश्न हे उपस्थित करता आला असता. प्रियंका गांधी म्हणाल्या की, २०२४ मध्ये पेपर लीकविरोधी कायदा मंजूर झाला असला तरी आजपर्यंत एकाही आरोपीला शिक्षा झालेली नाही. विद्यार्थ्यांची नावे सार्वजनिक केली जात आहेत. मात्र पेपर लीकच्या आरोपाविरोधात तसेच कठोर कारवाई होताना दिसत नाही, असा आरोप प्रियंका गांधींनी केला. या विधेयकावर सुरुवातीला सहा तास चर्चेसाठी वेळ निश्चित करण्यात आला होता. मात्र विरोधकांनी चर्चा वाढविण्याची मागणी केली. त्यावर संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी सरकार १० तास चर्चेसाठीही तयार असल्याचे सांगितले. मात्र या चर्चेच्या वेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी किंवा केंद्रीय गृहमंत्री अमित शहाही उपस्थित नव्हते. त्यांन विरोधकांच्या आरोपांना उत्तर देणे अपेक्षित होते.पण ज्यांच्यावर आरोप केले जात होते ते अमित शहाच सभागृहात नव्हते. अशा स्थितीत विद्यार्थ्यांवर पोलिसांनी केलेल्या अत्याचाराचा पाढा वाचून खासदारांनी अमित शहा यांना लक्ष केले. त्यावरच दोन्ही बाजूंनी आरोप-प्रत्यारोप होत राहिले. पोलिसांना लाठीमार आणि गोळीबार करण्याचा आदेश अमित शहा यांनी दिलाचा आरोप राहुल गांधी यांनी करताच सत्तारूढ सदस्यांनी प्रचंड गदारोळ केला. राहुल गांधीनी या विधेयकाचे पुरावे द्यावेत, त्यांनी ही माहिती कोणाकडून मिळवली, अशा प्रकारचा आरोप ते करू शकत नाहीत, त्यामुळे एकतर पुरावे द्या नाहीतर माफी मागा, अशी मागणी भाजपचे खासदार करीत होते. त्यामुळे विधेयकावर फारशी चर्चा होऊ शकली नाही.विरोधकांनी उपस्थित केलेले मुद्दे योग्यच होते. त्यावर उत्तर देण्यासाठी अमित शाह उपस्थित राहिले नाहीत. विरोधकांनी पोलिसी अत्याचाराविषयी स्वतंत्र चर्चेची मागणी करणे उचित ठरले असते. सार्वजनिक परीक्षा सुधारणा विधेयकातील तरतुदींवर सखोल चर्चा होऊन त्यात काही सुधारणाही विरोधक सुचवू शकले असते. या विधेयकातील तरतुदी अपुऱ्या आहेत का? त्यात आणखी काही तरतुदींची भर घालता येण्यासारखे आहे का? सरकार विद्यार्थ्यांच्या हिताविषयी गंभीर आहे की केवळ विधेयक आणून वेळ मारून नेण्याचे काम करीत आहे, यावर चर्चा होऊ शकली असती. धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा जेन-झीच्या प्रखर आंदोलनामुळे झाला, हे लक्षात घेतले पाहिजे. त्याचबरोबर सरकारच्या मनमानी कारभाराविरोधात केवळ संसदेत आवाज उठवून उपयोग नाही तर जेन-झीच्या माध्यमातून रस्त्यावर उतरूनच आवाज उठवावा लागेल. लोकसभेत जे परीक्षा सुधारणा विधेयक मंजूर करण्यात आले त्यातील तरतुदी:-१) सेक्शन १ आणि सेक्शन १० मध्ये तीन ते पाच वर्षे शिक्षा तसेच पाच ते दहा लाख रुपये दंडाची तरतूद होती. आता जे सुधारणा विधेयक आणलं गेलंय त्यात दहा वर्षांचा कारावास आणि जास्तीत जास्त ५० लाख रुपये दंडाची तरतूद आहे. २) सेक्शन १० च्या सब सेक्शन २ मध्ये सर्व्हीस प्रोव्हायडरचा उल्लेख आहे. कुठलीही कंपनी, कुठलीही प्रोप्रायटरशिप असे सगळेच त्यासाठी एक कोटी रुपये दंडाची तरतूद होती, तो दंड वाढवून पाच कोटी रुपये करण्यात आला आहे. ३) पेपर फुटी संदर्भातील सगळी प्रकरणे फास्ट ट्रॅक कोर्टात चालवली जातील आणि न्यायदान लवकरात लवकर म्हणजेच दोन महिन्यांच्या आत तपास पूर्ण करून पुढील तीन महिन्यांत न्यायालयात निर्णय दिला जाईल. म्हणजेच गुन्हा दाखल झाल्यापासून पुढच्या पाच महिन्यांत न्यायदान होईल. सार्वजनिक परीक्षांमधील गैरप्रकार रोखण्यासाठी सरकारने तयार केलेल्या सार्वजनिक परीक्षा सुधारणा कायद्यानुसार प्रश्नपत्रिका किंवा उत्तर तालिका फोडणे, परीक्षार्थींना अनधिकृत मदत करणे, संगणक यंत्रणेत फेरफार करणे, बनावट परीक्षा घेणे तसेच संघटित स्वरूपातील गैरप्रकार यासाठी कठोर शिक्षेची तरतूद केली गेली आहे. त्यामुळे पेपरफुटी विरोधात कायदेशीर चौकट आधीपासून अस्तित्वात आहे. जलद गती न्यायालयांतून आता त्यासंबंधीच्या खटल्यांना वेग देण्याचा प्रयत्न होईल. मात्र गुन्हा सिद्ध होण्यास वर्षे लागत असतील किंवा मुख्य सूत्रधार कायद्याच्या कचाट्यात येत नसतील तर केवळ कायद्यात कठोर शिक्षेची तरतूद पुरेशी ठरणार नाही.

मध्य रेल्वेने निसर्गाचे आव्हान निभावले - मुंबई - पुणे रेल्वे संपर्क यशस्वीरीत्या पूर्ववत

मध्य रेल्वेने कर्जत – लोणावळा या अतिशय कठीण आणि धोकादायक घाट विभागातील तिन्ही रेल्वे मार्ग – अप, डाउन आणि मध्य यशस्वीरीत्या दुरुस्त करून वाहतूक पूर्ववत केली आहे. अत्यंत प्रतिकूल हवामानात २३ दिवस चाललेल्या अथक मोहिमेनंतर, खंडाळा आणि मंकी हिल दरम्यानच्या 'अप' मार्गावरील शेवटचा तांत्रिक अडथळा दूर करून तो मार्ग सुरक्षित करण्यात आला आणि दिनांक २८ जुलै २०२६ रोजी सायंकाळी १८:४२ वाजता रेल्वे वाहतूक पुन्हा सुरू झाली.

दिनांक ५ जुलै २०२६ रोजी झालेला ३२७ मिमी पाऊस आणि दिनांक ६ जुलै २०२६ रोजी झालेला ६०० ते ६७० मिमी इतका प्रचंड पाऊस यामुळे लोणावळा – कर्जत विभागातील अनेक ठिकाणी दरडी कोसळण्याच्या घटना घडल्या, ज्याचा परिणाम रेल्वे वाहतुकीवर झाला. तिन्ही मार्गांवर (अप, डाऊन आणि मध्य) परिणाम झाल्यामुळे दिनांक ६ जुलै २०२६ ते दिनांक २८ जुलै २०२६ या कालावधीत अनेक गाड्यांचे रद्दीकरण, शॉर्ट टर्मिनेशन, शॉर्ट ओरिजिनेशन, मार्ग बदलणे आणि वेळापत्रकात बदल करणे यांसारखे निर्णय घ्यावे लागले. यामुळे सुमारे ६६५ गाड्यांवर परिणाम झाला. तरीही, या विभागात सतत पाऊस पडत असतानाही, मध्य रेल्वेच्या टीमने आव्हानात्मक परिस्थितीचा धैर्याने सामना केला आणि युद्धपातळीवर दुरुस्तीचे काम हाती घेतले.

सततच्या पावसाविरुद्धचा लढा

ही दुरुस्ती मोहीम म्हणजे निसर्गाच्या कोपाविरुद्धचा एक कठीण लढा होता. दिनांक ६ जुलै २०२६ पासून, घाट विभागात सतत मुसळधार पाऊस पडत होता, ज्यामुळे अनेक ठिकाणी दरडी कोसळणे, मोठे खडक पडणे आणि रेल्वे मार्गाच्या बाजूचे भराव खचणे यांसारख्या घटना घडल्या. सुरुवातीला मलबा हटवल्यानंतरही सततच्या पावसामुळे पुन्हा माती आणि दगड कोसळण्याचे प्रकार घडत होते, ज्याचा सामना कर्मचाऱ्यांना करावा लागला. दिनांक ८ जुलै रोजी ही सततच्या पावसामुळे नव्याने दरडी कोसळल्या. पुढील नुकसान टाळण्यासाठी, अभियंत्यांनी पावसाचे पाणी आत जाण्यापासून रोखण्यासाठी आणि मातीची धूप थांबवण्यासाठी धोकादायक उतार आणि पावसाच्या पाण्यामुळे पडलेल्या भेगांवर मोठ्या प्रमाणावर ताडपत्री अंथरली. व्यापक नुकसान

दहा अत्यंत महत्त्वाच्या ठिकाणी झालेले नुकसान व्यापक आणि तांत्रिकदृष्ट्या गुंतागुंतीचे होते:

खंडाळा – मंकी हिल (अप मार्ग): हे सर्वात जास्त बाधित झालेले ठिकाण होते. येथे १३० मीटर लांबीच्या पट्ट्यात जमिन खचली; यात रेल्वे मार्ग ज्या मातीच्या बांधावर होता, तो बांध ४ मीटरपर्यंत खाली खचला, ज्यामुळे रुळाखालचा आधार पूर्णपणे नाहीसा झाला.

मंकी हिल – ठाकूरवाडी (डाऊन मार्ग): २०० मीटर उंच टेकडीवरून दरड कोसळल्यामुळे एक प्रचंड मोठा खडक संरक्षक भिंतीवर आदळला. यामुळे भिंत कोसळली आणि ५० मीटर लांबीचा रेल्वे मार्ग २० मीटर खोलीपर्यंत वाहून गेला.

बोगदा क्र. ५१ (मध्य आणि अप मार्ग): पावसाच्या प्रचंड प्रवाहामुळे बोगद्यात पाणी साचले; यामुळे रुळाच्या बाजूचा खडीचा थर वाहून गेला आणि रेल्वे मार्गाची रचना अस्थिर झाली.

> **११,००० पेक्षा अधिक कर्मचाऱ्यांच्या अथक परिश्रमातून आणि १,४०,९४० मनुष्य-तासांच्या कामातून कर्जत – लोणावळा घाट विभागातील तिन्ही मार्ग पूर्ववत करण्यात आले.**

तैनात केलेली यंत्रसामग्री खालीलप्रमाणे
१८ जेसीबी,
२० पोकलेन एक्स्कॅव्हेटर्स (यात २ विशेष 'लाँग-बूम' पोकलेनचा समावेश होता),
पाइलिंगसाठी 'रिग' मशीन आणि अनेक डंपर्स. भराव आणि स्थिरीकरणासाठी वापरलेले साहित्य:
४६,४६० घनमीटरपेक्षा जास्त ग्रॅन्युलर सब-बेस आणि
२,६०० घनमीटर मोठे दगड
अत्याधुनिक संरक्षणासाठी खालील गोष्टींची उभारणी:
८,४१८ मीटर सेल्फ-ड्रिलिंग अँकर्स,
१,८०० चौरस मीटर उच्च-क्षमतेची जाळी (जिओमॅट),
१,७०० घनमीटर गॅबियन भिंती आणि
७,५०० वाळूची पोती
साहित्य वाहतूक: रस्तेमार्गाने अजिबात पोहोचता न येणाऱ्या ठिकाणांपर्यंत साहित्य पोहोचवण्यासाठी ११० पेक्षा अधिक रेकचा वापर करण्यात आला.
अंतिम अडथळा दूर करणे

आव्हानपूर्ण पुनर्स्थापना कार्य – ११,७०० पेक्षा अधिक कर्मचारी, ४० यंत्रे आणि १,४०,९४० 'मॅन-आवर्स'

हे आव्हान उचलण्यासाठी, मध्य रेल्वेने ११,७४५ कर्मचाऱ्यांचे (यात २,५१४ विभागीय कर्मचारी आणि ९,२३१ कंत्राटी कामगारांचा समावेश होता) अभूतपूर्व मनुष्यबळ तैनात केले. २३ दिवसांच्या कालावधीत 'युद्धपातळीवर' अहोरात्र (२४/७) काम करून, सुरक्षितता आणि कामाची जलद प्रगती सुनिश्चित करण्यासाठी या टीमने अंदाजे १,४०,९४० 'मॅन-आवर्स' इतके श्रमदान केले.

मध्य मार्ग दिनांक ७ जुलै २०२६ रोजी आणि 'डाउन मार्ग' दिनांक १४ जुलै २०२६ रोजी पूर्ववत करण्यात आली होती, तरीही 'अप मार्ग' पूर्ववत करणे हे अधिक आव्हानात्मक काम ठरले. मध्य रेल्वेच्या समर्पित टीमने दिनांक २८ जुलै २०२६ रोजी 'अप मार्ग' वाहतुकीसाठी सज्ज केली. तात्पुरती दुरुस्ती पूर्ण झाली असली तरी, दीर्घकालीन सुरक्षितता आणि स्थिरता सुनिश्चित करण्यासाठी कायमस्वरूपी उपाययोजनांचे काम आधीच सुरू आहे. यामध्ये संवेदनशील ठिकाणी १२०० मिमी व्यासाचे 'बोर्ड कास्ट-इन-सिटू पाइल्स' आणि आरसीसी रिटेनिंग भिंतींच्या बांधकामाचा समावेश आहे.

मुंबई आणि पुणे यांना जोडणारी ही महत्त्वपूर्ण जीवनवाहिनी पूर्ववत करण्यासाठी जीवघेण्या हवामानाचा आणि कठीण भूप्रदेशाचा सामना करणाऱ्या पर्यवेक्षक, अभियंते आणि कामगारांबद्दल मध्य रेल्वे अत्यंत कृतज्ञता व्यक्त करते.

हे आव्हान निभावताना आणि झालेल्या गैरसोयीबद्दल प्रशासनाला सहकार्य केल्याबद्दल मध्य रेल्वे आपल्या प्रवाशांच्या सम जूतदारपणाची आणि सहकार्याचीही दखल घेते.

मध्य रेल्वे आपल्या प्रवाशांना सुरक्षित, विश्वसनीय आणि आरामदायी सेवा देण्यासाठी कटिबद्ध आहे.

एबीडी माएस्ट्रोचा बहु-शहरी बारटेंडिंग प्लॅटफॉर्म बार माएस्ट्रो मुंबईतील नवोदित कॉकटेल टॅलेंटला प्रकाशझोतात आणत आहे

मुंबई: भारतातील नवोदित मिक्सोलॉजिस्टना एकत्र आणणाऱ्या अत्यंत यशस्वी पदार्पणानंतर बार माएस्ट्रो आता राऊंड २ मध्ये पोहोचला आहे. हा सात शहरांमधील बारटेंडिंग चॅलेंज अलाईड ब्लेंडर्स अँड डिस्टिलर्स लिमिटेडचा (एबीडी) लक्झरी आणि सुपर-प्रीमियम स्पिरिट्स विभाग एबीडी माएस्ट्रो प्रायव्हेट लिमिटेडद्वारे तुल्लीहो बेव्हरेज अकॅडमीच्या सहयोगाने आयोजित केला जात आहे. सुरुवातीच्या फेरीने देशभरातून ३५० हून अधिक नोंदी आकर्षित केल्या, तर या स्पर्धेभोवतीच्या चर्चेला सोशल मीडियावर व्यापक प्रतिसाद मिळाला. इंस्टाग्रामवर ७.६ दशलक्षहून अधिक व्ह्यूज मिळाले, ज्याने भारतातील नवोदित कॉकटेल टॅलेंटबाबत असणारा उत्साह अधोरेखित केला आहे.

सुरुवातीच्या फेरीच्या केंद्रस्थानी सर्जनशीलतेवर आधारित एक आव्हान होते: वूडबर्न्स कंटेंपररी इंडियन व्हिस्कीचा वापर करून एक मूळ हायबॉल कॉकटेल तयार करणे. बारटेंडर्सनी स्वतःला आकार देणाऱ्या परंपरा आणि भूप्रदेशांकडे पाहिल्यामुळे भारताच्या विविध वारशाची सुंदर झलक समोर आली. देशभरातील निवडीनंतर, १६० मिक्सोलॉजिस्ट राऊंड २ मध्ये प्रवेश करत आहेत, ज्यामध्ये प्रत्येक शॉर्टलिस्ट केलेले कॉकटेल तांत्रिक प्राविण्य, कल्पकता आणि सांस्कृतिक कथांकथनासाठी वेगळे ठरते.

मुंबई या स्पर्धेत उत्कृष्ट बाजारपेठ म्हणून समोर आली आहे, ज्याने शहराइतक्याच विविध आणि गतिमान नोंदी सादर केल्या. स्थानिक बारटेंडर्सनी प्रादेशिक चवींना आधुनिक कॉकटेल संस्कृतीत अत्यंत कौशल्याने समाविष्ट केले, मग ते सुक्या बोंबलाद्वारे कोळी परंपरांचा सन्मान असो, शुभ्र इंद्रायणी तांदळाच्या माध्यमातून महाराष्ट्रीयन संस्कृतीचा गौरव असो किंवा नारळ आणि कोकमाच्या साहाय्याने किनारी ओळख टिपणे असो.

प्रत्येक निर्मितीने तांत्रिक उत्कृष्टतेची सांस्कृतिक कथांकथनासोबत सुरेख सांगड घातली. कल्पकता आणि तांत्रिक कौशल्याच्या या शानदार प्रदर्शनामुळे एबीडी माएस्ट्रोने या शहराची स्पर्धात्मक क्षेत्र मर्यादा वाढवून मुंबईतील राउंड २ च्या शॉर्टलिस्टची संख्या २० वरून दुप्पट करून ४० बारटेंडर्सवर नेली आहे.

भारताच्या रस्त्यांवर ओलेक्ट्राच्या ४,००० इलेक्ट्रिक बसेस

मुंबई: ओलेक्ट्रा ग्रीनटेक लिमिटेडने भारतात ४,००० इलेक्ट्रिक बसेस रस्त्यावर उतरवून एक महत्त्वाचा टप्पा गाठला आहे. पर्यावरण संरक्षण आणि प्रदूषण नियंत्रणाच्या दृष्टीने हे एक चांगले पाऊल मानल जात आहे. हिमाचल प्रदेशात झालेल्या कार्यक्रमात मुख्यमंत्री श्री सुखविंदर सिंह सुक्खू आणि उपमुख्यमंत्री श्री मुकेश अग्निहोत्री यांना ४,०००वी बस प्रतिकात्मक पध्दतीने सुपूर्द करण्यात आली.

महाराष्ट्रातही ओलेक्ट्राच्या ई-बसेस प्रवाशांना सेवा देत आहेत. मुंबईतील बेस्ट, राज्यभरातील एमएसआरटीसी, पुण्यातील पीएमपीएमएल आणि ठाण्यातील टीएमसी या संस्था या आवाजरहित बसेस वापरत आहेत. शांत, आरामदायी आणि प्रदूषणमुक्त प्रवासाची संधी प्रवाशांना घेता येत आहे. आजवर ओलेक्ट्राच्या बसेसनी ७३ कोटी हरित किलोमीटर अंतर पार केले असून, यामुळे ६.५ लाख टन सीओ२ उत्सर्जन रोखले गेले आहे. हे मुंबईसारख्या महानगरातील नागरिकांसाठी स्वच्छ हवा आणि आरोग्यदायी वातावरण निर्माण करण्यास महत्त्वाचे आहे. कंपनीकडे ८,५०० पेक्षा अधिक वाहनांचे ऑर्डर बुक आहे .

वेस्टलाइफ फूडवर्ल्ड लिमिटेड

westlife Foodworld

नोंदणीकृत कार्यालय: १००१, टॉवर-३, १०वा मजला, एक आंतरराष्ट्रीय केंद्र, सेनापती बापट मार्ग, प्रभादेवी, मुंबई-४०००१३.
सीआयएन:एल६५९९०एमएच१९८२पीएलसी०२८५९३
दूर.:०२२-४९१३५०००, फॅक्स:०२२-४९१३ ५००१
वेबसाइट: www.westlife.co.in । ई-मेल:shatadru@mcdonaldsindia.com

अंतरिम लाभांश आणि नोंदणी तारीखबाबत सूचना

याद्वारे सूचना देण्यात येते की, सेबी (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स अँड डिस्क्लोजर रिक्वायरमेंट्स) रेग्युलेशन्स, २०१५ च्या नियम ४२ मधील तरतुदी आणि त्यासोबत कंपनी कायदा, २०१३ चे कलम ९१ व त्याअंतर्गत केलेले नियम यांच्या अनुषंगाने; कंपनीच्या संचालक मंडळाने गुरुवार, ३० जुलै २०२६ रोजी झालेल्या सभेत, ३० जून २०२६ (वित्तीय वर्ष २०२६-२७) रोजी संपलेल्या तिमाहीतील आर्थिक कामगिरीच्या आधारे, प्रत्येकी रु.२/- दर्शनी मूल्य असलेल्या आणि पूर्णपणे भरणा असलेल्या इक्विटी शेअर्सवर प्रति शेअर रु.०.४० इतका अंतरिम लाभांश जाहीर केला आहे. तसेच, सदर सभेत जाहीर झालेला अंतरिम लाभांश मिळण्यास पात्र असलेल्या भागधारकांची निश्चिती करण्यासाठी कंपनीने शुक्रवार, ७ ऑगस्ट २०२६ ही नोंदणी तारीख निश्चित केली आहे.

वेस्टलाइफ फूडवर्ल्ड लिमिटेड
सही/-
डॉ. शतद्रू सेनगुप्ता
कंपनी सचिव

ठिकाण: मुंबई
दिनांक: ३०.०७.२०२६

सार्वजनिक जाहीर नोटीस

याद्वारे सर्व संबंधितांना जाहीर करण्यात येते की, माझे अशील श्री. सतीश किशन हवाळे व सौ. लीला सतीश हवाळे, हे निर्माण विहार को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लिमिटेड, राजमाता जिजाबाई रोड, विकास नगर, पंप हाऊस, अंधेरी (पूर्व), मुंबई – ४०००९३ येथील सी विंग, चौथा मजला, फ्लॅट क्र. ४०३ चे कायदेशीर संयुक्त मालक आहेत.

माझ्या अशिलांकडे सदर सोसायटीने दिलेले मूळ शेअर सर्टिफिकेट होते. सदर शेअर सर्टिफिकेट लॅमिनेट केल्यामुळे ते खराब झाले असून, ते त्यांनी रद्द करण्यासाठी सोसायटीकडे जमा केले आहे. त्याबदल्यात सोसायटीकडून नवीन शेअर सर्टिफिकेट देण्याची कार्यवाही सुरू आहे.

याद्वारे जाहीर करण्यात येते की, जुने शेअर सर्टिफिकेट सोसायटीकडे जमा करून नवीन शेअर सर्टिफिकेट प्राप्त झाल्याच्या दिवसापासून पूर्वीचे शेअर सर्टिफिकेट रद्द, अवैध व कायदेशीरदृष्ट्या निष्प्रभ समजण्यात येईल. त्याचा कोणत्याही प्रकारे वापर करणे, त्यावर कोणताही व्यवहार करणे अथवा त्याचा आधार घेणे बेकायदेशीर व अमान्य राहील.

सदर शेअर सर्टिफिकेट किंवा खाली नमूद केलेल्या अनुसूचित मालमत्तेबाबत कोणत्याही व्यक्तीस तारण, गहाण, बोजा, लियन, परवाना, भाडेपट्टा, पोटभाडेपट्टा, हस्तांतरण, विक्री करार, विश्वस्त हक्क, वारसा, न्यायालयाचा आदेश, लवादाचा निवाडा, हितसंबंध अथवा अन्य कोणताही हक्क, दावा किंवा स्वारस्य असल्यास त्यांनी त्यासंबंधीची सर्व कागदपत्रे जोडून लेखी हरकत खाली सही करणाऱ्याकडे मैत्रेयी कन्सल्टन्सी, १०४-ए, द बया गोल्डस्पॉट, काजुवाडी, चकाला, अंधेरी (पूर्व), मुंबई – ४०००९९ येथे ही नोटीसप्रसिद्ध झाल्यापासून १५ (पंधरा) दिवसांच्या आत सादर करावी.

निर्धारित मुदतीत कोणताही दावा किंवा हरकत प्राप्त न झाल्यास, कोणत्याही व्यक्तीस सदर रद्द करण्यात आलेल्या शेअर सर्टिफिकेटवर किंवा अनुसूचित मालमत्तेवर कोणताही हक्क, दावा किंवा स्वारस्य नसल्याचे गृहीत धरले जाईल. त्यानंतर करण्यात येणारा कोणताही दावा हा स्वेच्छेने सोडून दिलेला, त्याग केलेला व कायमस्वरूपी ग्राह्य धरला जाणार नाही असे समजले जाईल. अशा परिस्थितीत सोसायटीला माझ्या अशिलांच्या नावाने नवीन शेअर सर्टिफिकेट जारी करण्यास कोणताही कायदेशीर अडथळा राहणार नाही.

याव्यतिरिक्त, जर कोणी व्यक्ती रद्द करण्यात आलेल्या जुन्या शेअर सर्टिफिकेटचा कोणत्याही प्रकारे वापर करण्याचा अथवा त्याच्या आधारे कोणताही व्यवहार करण्याचा प्रयत्न करील, तर ते शेअर सर्टिफिकेट पूर्णपणे रद्द, अवैध व निष्प्रभ असल्यामुळे अशा व्यक्तीची सर्वस्वी जबाबदारी राहील.

अनुसूचित मालमत्ता

निर्माण विहार को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लिमिटेड, राजमाता जिजाबाई रोड, विकास नगर, पंप हाऊस, अंधेरी (पूर्व), मुंबई – ४०००९३ येथील सी विंग, चौथा मजला, फ्लॅट क्र. ४०३ यासंबंधित शेअर सर्टिफिकेट तसेच सदर फ्लॅटवरील सर्व हक्क, मालकी व संबंधित कागदपत्रे.

स्थळ : मुंबई दिनांक : ३१ जुलै २०२६
सही/-
ॲड. कविता केदारी टाळकर

PUBLIC NOTICE

NOTICE is hereby given that, my client **SMT. CHARULATA BHUPENDRA MEHTA & W/O deceased SHRI BHUPENDRA JIVRAJ MEHTA**, the who is the rightful owner of the Flat No. 1202 twelve floor, 4B Pancharatna Co-operative Housing Society LTD. Damodar Park, Ghatkopar West, Mumbai-400086 , was travelling with son **SHRI JAYESH BHUPENDRA MEHTA** by Autorikshaw from Nearby Borivali Railway station to Ghatkopar bus stop after doing legal documents formalities works and they were carrying alongwith all original three documents of the aforesaid property Flat No. 1202 twelve floor 4B Pancharatna Co-operative Housing Society LTD. Damodar Park, Ghatkopar West, Mumbai-400086 i.e Original Agreement for sale first one between **PARUL ENTERPRISE** having address 312, Maker Bhavan N0.3, New Marine Lines, Bombay-400020 dated 12th June 1981 and **Dr. Bharat H. Talsania & Mrs. Nikita Bharat Talsania** and next Second one Agreement of Sale between Dr. Bharat H. Talsania & Mrs Nikita Bharat Talsania and Shri Sudhir Rasiklal Sheth & Smt Sonal Sudhir Sheth dated 27th January 1994 and next third one Agreement of Sale between Shri Sudhir Rasiklal Sheth & Smt Sonal Sudhir Sheth and Smt. Charulata Bhupendra Mehta & Shri Bhupendra Jivraj Mehta ourself dated 27th September 1994 duly registered 7th April 1995. When they picked up the Autorikshaw all original three documents of the said property were with them but when they reached and alighted at the Ghatkopar Bus stop. They found that the Original Agreement for sale between PARUL ENTERPRISE having address 312, Maker Bhavan N0.3, New Marine Lines, Bombay-400020 dated 11th May 1982 between Dr. Bharat H. Talsania & Mrs. Nikita Bharat Talsania missing lost / misplaced. They have reported on Mumbai Police portal Vide Lost Report No.103069-2026 dated 27/07/2026 Further they tried to search everywhere of the locality but could not get it, but it is lost beyond recovery. All person/persons are hereby informed to put in their claims or interest of objection about the said property within 10 days along with the sufficient evidence from appearance of this notice. Any person/s having found the above-mentioned Original Documents in respect to the said property will be rewarded and the same are required to intimate to the below address.

LAPWING GROUP, ASSOCIATE /ADVOCATES
155, SADIK BUILDING, LBS Marg, Kurla West, Mumbai-400070. **Mob.: 8779977158/88981 40777**

निवास हौसिंग फायनान्स लिमिटेड

NIWAS HOUSING FINANCE

(पुर्वीची निवास हौसिंग फायनान्स प्रायव्हेट लिमिटेड)
नोंद. कार्या.: ए१, ६वा मजला, ट्रेड स्टार, अंधेरी कुर्ला रोड, जे बी नगर, अंधेरी (पुर्व), मुंबई-४०००५९.

ताबा सूचना

(नियम ८(१) व (२))

ज्याअर्थी, खालील स्वाक्षरीकर्ता हे सिक्युरीटायझेशन अँन्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फिनान्शियल अॅसेटस् अँन्ड एनफोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट (अॅक्ट) २००२ अंतर्गत प्रतिभुत धनकोंचे प्राधिकृत अधिकारी आहेत आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेन्ट) रूल्स, २००२ च्या नियम ३ सहवाचिता कलम १३(२) अन्वये असलेल्या अधिकाराअंतर्गत कर्जदारांना खाली नमूदप्रमाणे मागणी सूचना वितरित केली होती आणि त्या सूचनेनुसार सदर सूचना प्राप्त तारखेपासून ६० दिवसांच्या आत रक्कम जमा करण्यास सांगण्यात आले होते.

सदर कर्जदार यांनी वर नमूद केलेली रक्कम भरण्यास असमर्थ ठरले असून कर्जदार व सर्वसामान्य जनतेस येथे सूचित करण्यात येत आहे की, **एनएचएफएल**चे प्राधिकृत स्वाक्षरीकर्ता असलेल्या खालील स्वाक्षरीकर्त्यांनी सदर कायद्याच्या कलम १३(४) सहवाचिता सदर अधिनियमाच्या नियम ८ अन्वये त्यांना प्राप्त असलेल्या अधिकाराअंतर्गत खाली नमूद केलेल्या मालमत्तेचा **ताबा** प्रत्येक मालमत्ते समोर नमुद तारखेला घेतलेला आहे.

कर्जदारांचे लक्ष वेधण्यात येत आहे की, प्रतिभूत मालमत्ता सोडवून घेण्यासाठी उपलब्ध वेळेसंदर्भात कायद्याच्या कलम १३ चे उपकलम (८) ची तरतूद आहे.

विशेषतः कर्जदार व सर्वसामान्य जनतेस येथे सावध करण्यात येते की, सदर मालमत्तेसह कोणताही व्यवहार करू नये आणि सदर मालमत्तेसह व्यवहार केलेला असल्यास त्यांनी **एनएचएफएल**कडे सूचनेत नमूद रक्कम तसेच मागणी सूचनेच्या तारखेपासून करारदराने पुढील व्याज व इतर शुल्क जमा करावे.

कर्ज खाते क्रमांक	कर्जदार व मालमत्ता तपशील	मागणी सूचना दिनांक व रक्कम	ताबा दिनांक	ताबा स्थिती
LNBEL0HL-02250054061	१. मयुरेश नरेंद्र लाडे (कर्जदार), २. स्नेहा गोरखनाथ मदने (सह-कर्जदार)	**रु.३२,५७,९१३/-** (रुपये बत्तीस लाख सत्तावन्न हजार नऊशे तेरा फक्त) **दिनांक: १८ मे, २०२६**	२७ जुलै, २०२६	सांकेतिक ताबा

मालमत्ता तपशील: प्लॉट क्र.बी-२२, सेक्टर-०७, नवीन पनवेल (प.), नवी मुंबई, ता. पनवेल, जि. रायगड आणि नोंदणी उप-जिल्हा रायगड येथील मालमत्तेच्या जागेचे सर्व भाग व खंड. **पुढीलप्रमाणे चतुसिमाः उत्तरेसः** संलग्न कंपाऊंड; **दक्षिणेसः** संलग्न कंपाऊंड; **पुर्वेसः** संलग्न जमीन; **पश्चिमेसः** संलग्न जमीन. द्वितीय अनुसुची पुढीलप्रमाणे युनिट क्र.२५, क्षेत्रफळ सुमारे २८.०० चौ.मी. बिल्टअप क्षेत्र, अमर कोहौसोलि. म्हणून ज्ञात सोसायटी, बांधकाम जमीन प्लॉट क्र.बी-२२, सेक्टर-०७, नवीन पनवेल (प.), नवी मुंबई, ता. पनवेल, जि. रायगड. **पुढीलप्रमाणे चतुसिमाः पुर्वेसः** वास्तविकनुसार; **पश्चिमेसः** वास्तविकनुसार; **उत्तरेसः** वास्तविकनुसार; **दक्षिणेसः** वास्तविकनुसार.

सही/-
प्राधिकृत अधिकारी
निवास हौसिंग फायनान्स लिमिटेड

ठिकाणः रायगड
दिनांकः ३१.०७.२०२६

PUBLIC NOTICE
LOSS OF ID CARD

This is to bring to the notice of the general public that one ID Card of Mr. Saurabh V. Singh issued by ICICI Bank ltd. having ID card no. 2550543 has been found missing and/or lost on 26th July 26. Anyone, who finds the said ID card, is requested to return the said ID card to the Manager Debt Services & Management Group, ICICI Bank Limited, C Wing, Autumn Estate, Chandivali Farm Road, Opposite MHADA Colony, Chandivali, Andheri East, Mumbai, Maharashtra, 400072.

Therefore, all the customers of ICICI Bank Limited are hereby notified not to make any payment to any unauthorised person holding the said ID card no - 2550543

Please take further notice that anybody making payment to any person holding the said ID card shall do so at his/her own costs, risk and peril and ICICI Bank shall not be bound and/or responsible for any payment.

Date: 31st July 2026
Place: Mumbai
For ICICI Bank Limited
Sd/-

जाहीर सूचना

सर्व जनतेस याद्वारे सूचित करण्यात येते की, माझे अशिल श्री. शबानअली मर्चंट, प्यारेअली जाफरअली मर्चंटयांचा मुलगा, पत्ता: फ्लॅट क्र. १३, १३ वा मजला, खैरुन्निसा हाईट्स, रोड क्र. २, जैन हॉस्पिटलजवळ, डोंगरी मार्केट, चिंचबंदर, मुंबई – ४००००९ हे असे जाहीर करतात की, त्यांचे वडील श्री. प्यारेअली जाफरअली मर्चंट हे फ्लॅट क्र. ००७, तिसरा मजला, 'राज अपार्टमेंट को-ऑप. हाउसिंग सोसायटी लि.', मिलिटरी रोड, मरोळ, अंधेरी (पूर्व), मुंबई – ४०००५९ येथील फ्लॅटचे मालक आणि सोसायटीचे सभासद होते. त्यांच्याकडे उक्त फ्लॅटसंदर्भात सोसायटीने जारी केलेले विशिष्ट क्रमांक ३१ ते ३५ धारक शेअर प्रमाणपत्र क्र. ७ होते. माझ्या अशिलांचे वडील श्री. प्यारेअली जाफरअली मर्चंट यांनी 'मेसर्स अव्वल होल्डिंग्स प्रा. लि.' या बिल्डरसकडून ११ ऑक्टोबर १९८९ रोजी झालेल्या करारनाम्याद्वारे उक्त फ्लॅट खरेदी केला होता. त्यांचे २८ जुलै २००१ रोजी मुंबई येथे निधन झाले आणि त्यांच्या आई श्रीमती अमीनाबाई पी. मर्चंट यांचेही १२ एप्रिल २००८ रोजी मुंबई येथे निधन झाले. त्यांच्या पश्चात माझे अशिल (१) श्री. शबानअली मर्चंट, (२) श्री. मोहम्मद रझा प्यारे अली, (३) श्रीमती कनीज फातेमा हसेनैन अब्बास, (४) श्रीमती ताहिरा अली हुसेन लखानी, (५) श्री. सादिकहुसेन प्यारेअली मर्चंट आणि (६) श्री. महबिबुल महदी प्यारेअली मर्चंट हे सहाजण उक्त फ्लॅटचे वारसदार आणि कायदेशीर प्रतिनिधी आहेत. सध्या माझ्या अशिलाच्या आणि त्याच्या वर नमूद केलेल्या माझ्या भाऊ-बहिणींचा सदर फ्लॅटमधील शेअर्सवर हक्क/ अधिकार आहे.

सदर फ्लॅटबाबतचा ११ ऑक्टोबर १९८९ रोजीचा मूळ करारनामा माझ्या अशिलाच्या वडिलांकडून हरवला/गहाळ झाला आहे आणि कसून शोध घेऊनही तो करारनामा सापडलेला नाही.

कोणत्याही व्यक्तीने, इतर कायदेशीर वारसांसह, ज्यांना तो करारनामा सापडला असेल आणि/किंवा ज्यांचा सदर फ्लॅटबाबत मालकी, गहाण, तारण, भाडेकरूपणा, वारसाहक्क किंवा अन्य कोणत्याही प्रकारे कोणताही हक्क, हितसंबंध किंवा हिस्सा असल्याचा दावा असेल, त्यांनी ही सूचना प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या आत खाली सही करणाऱ्यास कळवावे; अन्यथा असे मानले जाईल की सदर फ्लॅट आणि शेअर्सवर कोणाचाही कोणताही हक्क, हितसंबंध, हिस्सा किंवा दावा नाही आणि केवळ माझ्या अशिलाचा व त्याच्या वर नमूद केलेल्या भाऊ-बहिणींचाच सदर फ्लॅटवर हक्क, मालकी, हितसंबंध, दावा आणि हिस्सा आहे.

मुंबई, दिनांक: ३१.०७.२०२६

श्री. आनंद मनोहर पालांडे
उच्च न्यायालय वकील
दुकान क्र. एलजी-०८, सुचिता बिझनेस पार्क, पंत नगर, घाटकोपर (पूर्व), मुंबई – ४०००७७.
मोबाईल: ९९८७२३५७५८.

जाहिर नोटीस (अपील क्र. ११८/२०२५)

सुनंदा सुरेश कांबळे ...अपिलार्थी

विरुध्द

सहायक महापालिका आयुक्त जी/दक्षिण विभाग व इतर ०३. ...उत्तरार्थी

प्रति,
१. भिकाबाई धोंडीराम सावंत
रुम नं.४५, (जुनी खोली क्र.३४) शिवशक्ती नगर, जे. आर. बोरीचा मार्ग, सातरस्ता धोबीघाट, मुंबई- ४०० ०११. ... उत्तरार्थी क्र. ०२
२. अध्यक्ष/सचिव
श्रमिक एकता सहकारी गृहनिर्माण संस्था, जे.आर.बोरीचा मार्ग, सातरस्ता, मुंबई-४०० ०११. ... उत्तरार्थी क्र. ०३
३. विकासक
मेसर्स लोखंडवाला कटारिया कंन्स्ट्रक्शन ७२, गांधीनगर दैनिक शिवनेरी रोड, वरळी मुंबई- ४०० ०१८. ... उत्तरार्थी क्र.०४

सदर जाहिर नोटीसी द्वारे आपणांस सुचित करण्यात येते की, अपिलार्थी यांनी महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ मधील कलम ३५ अंतर्गत मा. अपर जिल्हाधिकारी तथा अपिलीय प्राधिकारी, मुंबई शहर, पहिला मजला, जुने जकात घर, शहिद भगतसिंग रोड, फोर्ट, मुंबई ४००००१ येथे श्रमिक एकता सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या परि-२ मधील अ.क्र. ३६ वर सदानंद सुरेश कांबळे असे नाव नमुद असून अपिलार्थी यांनी परिशिष्ट-२ मधील अ.क्र३६ वर सदानंद सुरेश कांबळे ऐवजी सुनंदा सुरेश कांबळे अशी नावात दुरुस्ती करुन त्रतेकामी अपील अर्ज दाखल केलेला असून सदर झोपडी आपणाकडून खरेदी केलेली असल्याने आपणांस उत्तरार्थी क्र.०२ केले आहे. तसेच संस्था व विकासक यांना उत्तरार्थी क्र. ०३ व ०४ केले आहे. प्रकरणी दि. ३०.०१.२०२६ रोजीचे सुनावणी मध्ये उत्तरार्थी क्र.०२, ०३ व ०४ गैरहजर असल्याने मा.अपर जिल्हाधिकारी तथा अपिलीय प्राधिकारी, मुंबई शहर यांनी आपणांस पुढील सुनावणी तारखेबाबत जाहिर नोटीसीद्वारे अवगत करणेचे निर्देश दिले आहेत.

तरी सदर जाहिर नोटीसीद्वारे सर्व उत्तरार्थी यांना सुचित करण्यात येते की, दि. ०७.०८.२०२६ रोजी सकाळी ११.३० वाजता मा.अपर जिल्हाधिकारी तथा अपिलीय प्राधिकारी, मुंबई शहर यांचे दालनात सुनावणी आयोजित केलेली आहे. तरी सदर सुनावणीस आपण उपस्थित /हजर राहून, आपली बाजू मांडावी. उपरोक्त नमूद केलेल्या दिवशी आपण स्वतः अथवा आपले प्राधिकृत प्रतिनिधी उपस्थित न राहिल्यास, आपणास काहीही सांगावयाचे नाही, असे गृहित धरुन प्रकरणी गुणवत्तेवर निर्णय घेण्यात येईल, यांची नोंद घ्यावी.

(संदिप ढाकणे)
सहाय्यक महसुल अधिकारी
अपर जिल्हाधिकारी कार्यालय, मुंबई शहर

जाहीर सूचना

माझे अशिल **श्रीमती शांतीबेन विरजी सतरा हे कै. विरजी गाभु सतरा** यांचे कायदेशीर वारसांपैकी एक आहेत. **कै. विरजी गाभु सतरा हे फ्लॅट नं. २०१, २रा मजला, आनंद कृपा को. ऑप. हौ. सोसायटी लि,** उथळसर नाका , ठाणे (प) ४००६०१ चे मालक होते.माझे अशिल **श्रीमती शांतीबेन विरजी सतरा** यांचे पती **कै.विरजी गाभु सतरा** यांचे **दिनांक २७.१०.२०१७** रोजी निधन झाले आहे. माझे अशिलांचे सांगणेवरुन व मला कळविल्याप्रमाणे माझे आशिल (१) **श्रीमती शांतीबेन विरजी सतरा** (पत्नी) आणि (२) **श्री. परेश विरजी सतरा (मुलगा)**, (३) **सौ. जयश्री निलेश छाडवा (विवाहित मुलगी)**, आणि (४) **श्री. अनिल विरजी सतरा (मुलगा)**, हे **कै. विरजी गाभु सतरा** यांचे कायदेशीर वारस आहेत.

या कायदेशीर वारसांव्यतिरिक्त,उपरोक्त फ्लॅट वरील हक्क, शीर्षक, हिस्सा आणि/किंवा स्वारस्यावर कोणताही दावा असल्यास त्याने/तिने ही नोटीस जारी केल्यापासून १४ दिवसांच्या आत माझ्याशी संपर्क साधावा. विहित मुदतीत उपरोक्त फ्लॅट मधील मृत व्यक्तीच्या हिश्याबाबत कोणतेही दावे/आक्षेप प्राप्त झाले नाहीत तर वरील व्यक्तींशिवाय **कै. विरजी गाभु सतरा** यांचे अन्य कायदेशीर वारस नाहीत असे मानले जाईल.

Sd/-
Date: 31/07/2026 Adv. Shital Kadam Chavan
A2/301, Chavandai Tower CHS, 90 Feet Road, Opp. Raj Park,Parsik Nagar,Kalwa (W) 400605

मुंबई येथील मुंबई शहर दिवाणी न्यायालय, शाखा दिंडोशी
व्यावसायिक दावा क्र.७३/२०२५.

पंजाब आणि सिंध बँक
बँकिंग कंपन्या (अधिग्रहण आणि उपक्रमांचे हस्तांतरण) अधिनियम, १९७० अंतर्गत समाविष्ट असलेली एक बँकिंग कंपनी, जिचे मुख्य कार्यालय २७/२९, अंबालाल मार्ग, बॉम्बे स्टॉक एक्सचेंज जवळ, फोर्ट, मुंबई-४०००२३ येथे आणि शाखा कार्यालय **मालाड (पश्चिम) शाखा**, डी. जी. खेतान इंटरनॅशनल स्कूल, सुंदर नगर, मालाड (पश्चिम), मुंबई-४०००६४.
श्री. बिस्वनाथ सेन, प्राधिकृत अधिकारी यांच्यामार्फत ...वादी

विरुध्द

१. श्री. प्रशांत भगवंत पालांडे
२८/१०३, न्यू हर्ष एकॉर्ड, शांती पार्क, रॉयल एकॉर्ड जवळ, मीरा रोड (पूर्व), ठाणे - ४०११०७.
२. सौ. वैशाली प्रशांत पालांडे
२८/१०३, न्यू हर्ष एकॉर्ड, शांती पार्क, रॉयल एकॉर्ड जवळ, मीरा रोड (पूर्व), ठाणे - ४०११०७.
३. श्री.अविनाश भगवंतराव पालांडे
४. सुलेगल हाऊस, लक्ष्मण म्हात्रे रोड, नवागाव, दहिसर (पूर्व), ठाणे ४०० ०६८. .... प्रतिवादी

प्रति,
१. श्री. प्रशांत भगवंत पालांडे
२. सौ. वैशाली प्रशांत पालांडे
३. श्री. अविनाश भगवंतराव पालांडे
(वरनामित प्रतिवादी)

(न्यायालयीन खोली क्र.३ मध्ये दिनांक २६.११.२०२५ रोजी दिलेल्या आदेशानुसार)
नोंद घ्यावी की, उपरोक्त वादीतर्फे खालील मागण्यांसाठी, माननीय न्यायाधीश श्रीमती एन. एस. अनेकर यांच्या अध्यक्षतेखाली, न्यायालय कक्ष क्र.३, दिनांक ०६.०८.२०२६ रोजी स.११:०० वा. या न्यायालयात अर्ज दाखल केला जाईल:-

(अ) की प्रतिवादी क्र. १, २ आणि ३ यांना संयुक्तपणे आणि/किंवा स्वतंत्रपणे वादीला, दिनांक १८.१२.२०२४ रोजीची थकबाकी असलेली **रु.३,३२,३००.३४ (रुपये तीन लाख बत्तीस हजार तीनशे पैसे चौतीस फक्त)** इतकी रक्कम आणि सोबत जोडलेल्या व **'प्रकरण जे'** म्हणून चिन्हांकित केलेल्या दाव्याच्या तपशिलानुसार, दावा दाखल केल्याच्या तारखेपासून रक्कम अदा होईपर्यंत किंवा वसूल होईपर्यंत, रु.२,६२,९६६.०८ वर मासिक विरामासह १०.५०% प्रतिवर्ष दराने पुढील व्याज देण्याचा आदेश आणि हुकूम देण्यात यावा.

(अ) की प्रतिवादी क्र. १, २ आणि ३ यांना संयुक्तपणे आणि/किंवा स्वतंत्रपणे वादीला, दिनांक १८.१२.२०२४ रोजीची थकबाकी असलेली **रु.३,३२,३००.३४ (रुपये तीन लाख बत्तीस हजार तीनशे पैसे चौतीस फक्त)** इतकी रक्कम आणि सोबत जोडलेल्या व **'प्रकरण जे'** म्हणून चिन्हांकित केलेल्या दाव्याच्या तपशिलानुसार, दावा दाखल केल्याच्या तारखेपासून रक्कम अदा होईपर्यंत किंवा वसूल होईपर्यंत, रु.२,६२,९६६.०८ वर मासिक विरामासह १०.५०% प्रतिवर्ष दराने पुढील व्याज देण्याचा आदेश आणि हुकूम देण्यात यावा.

(ब) की दाव्याची सुनावणी आणि अंतिम निकाल लागेपर्यंत, या माननीय न्यायालयाने दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ च्या आदेश २१ नियम ४८ अन्वये, प्रतिवादीविरुद्ध निकालापूर्वी जप्तीचे वॉरंट जारी करावे, ज्याद्वारे **प्रकरण डी** मध्ये नमूद केल्याप्रमाणे जंगम मालमत्ता म्हणून गहाण ठेवलेले **टोयोटा, इनोव्हा** हे वाहन जप्त केले जाईल. थकीत रक्कम वसूल करण्यासाठी वादीकडे दुसरी कोणतीही सुरक्षा नाही. अशी पूर्ण भीती आहे की, या माननीय न्यायालयाकडून नोटीस/समन्स मिळाल्यावर, प्रतिवादी या माननीय न्यायालयाकडून पारित/जारी केले जाण्याची शक्यता असलेले आदेश निष्प्रभ करण्यासाठी, वादीकडे गहाण ठेवलेल्या उपरोक्त जंगम मालमत्तेची विल्हेवाट लावू शकतो.

(क) या वादीच्या अंतिम निकालापर्यंत, प्रतिवादीला उपरोक्त परिच्छेद (६) मध्ये तपशीलवार वर्णन केल्याप्रमाणे गहाण ठेवलेले जंगम मालमत्तेची विक्री, विल्हेवाट किंवा हस्तांतरण करण्यापासून अंतरिम मनाई हुकूम पारित करून रोखण्यात यावे.
(ड) की, वरील मागण्या (ब) ते (क) नुसार अंतरिम आदेश मंजूर करण्यात यावेत;
(इ) दाव्याचा खर्च; आणि
(फ) प्रकरणाचे स्वरूप आणि परिस्थितीनुसार आवश्यक असतील अशा पुढील आणि इतर दिलासांसाठी.

आज दिनांकित १८ फेब्रुवारी, २०२६ रोजी
सही/-
निबंधककरिता
शहर दिवाणी न्यायालय दिंडोशी

श्री. बीजू एन जेकब,
वादीचे वकील कार्यालय क्र. ११,
पहिला मजला, प्रिंटिंग हाउस, पोलीस कोर्ट लेन,
फोर्ट, मुंबई - ४०० ००१.